नवरात्रोत्सव व घटस्थापनेच्या मंगलमय शुभेच्छा !
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवास अनेक, शाबुदाणा मात्र फक्त कॅमलचाच
1 kg | 500gm | 250gm
सर्व किराणा दुकानांमध्ये उपलब्ध

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २६१। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | मंगळवार २७/१०/२०२६ । पाने- ६

सिल्क फेस्टिव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा महोत्सव सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा... राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०, ७९०१० ३११५५.

# सत्तासंघर्षात 'विखे-थोरात पॅटर्न'ची पहिली बाजी

## जिल्हा बँकेच्या उर्वरित १० जागांसाठी दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीने जिल्ह्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापवले असून, सहकाराच्या आखाड्यात वर्चस्वाची लढाई निर्णायक वळणावर पोहोचली आहे. बँकेच्या २१ संचालकपदांपैकी ११ जागा बिनविरोध करण्यात यश आल्याने 'विखे-थोरात पॅटर्न'ने पहिली बाजी मारल्याचे चित्र निर्माण झाले आहे. मात्र, उर्वरित १० जागांसाठी २७ उमेदवार रिंगणात असल्याने खरी राजकीय कसोटी अद्याप बाकी आहे. या जागांवरील लढतीतून जिल्ह्यातील राजकीय ताकद, नेत्यांचा प्रभाव आणि सहकारातील वर्चस्वाची दिशा स्पष्ट होणार आहे.




या निवडणुकीत डॉ. सुजय विखे पाटील, माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, राम शिंदे आणि खासदार निलेश लंके यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. बँकेच्या संचालक मंडळावरील वर्चस्वासाठी सुरू असलेली ही धडपड केवळ सहकार क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय समीकरणांची चाचपणी म्हणूनही या निवडणुकीकडे पाहिले जात आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सुरुवातीपासूनच बिनविरोध निवडीसाठी राजकीय पातळीवर हालचाली सुरू होत्या. डॉ. सुजय विखे पाटील यांनी विविध नेत्यांशी समन्वय साधत जागावाटप आणि उमेदवारांच्या निवडीबाबत अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या प्रक्रियेत बाळासाहेब थोरात यांच्यासह अन्य नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली.

११ जागा बिनविरोध होणे ही या राजकीय जुळवाजुळवीची महत्त्वपूर्ण घडामोड मानली जात आहे. मात्र, बिनविरोध निवडीमुळे सत्तासंघर्ष संपलेला नाही. उलट उर्वरित जागांवरील लढती अधिक प्रतिष्ठेच्या बनल्या आहेत. कोणत्या गटाची ताकद प्रत्यक्ष मतदानातून सिद्ध होते, याकडे आता राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

उर्वरित १० जागांसाठी २७ उमेदवार मैदानात उतरल्याने निवडणुकीतील चुरस वाढली आहे. आशुतोष काळे, डॉ. किरण लहामटे, प्राजक्त तनपुरे, माजी आमदार वैभव पिचड आणि खासदार निलेश लंके यांच्याशी संबंधित राजकीय समीकरणे या लढतीत महत्त्वाची ठरण्याची शक्यता आहे.

भाजपच्या उमेदवारांना रोखण्यासाठी होणारी संभाव्य जुळवाजुळव, विविध गटांमधील समन्वय आणि स्थानिक पातळीवरील नेत्यांचे प्रभावक्षेत्र यामुळे निवडणुकीचे चित्र गुंतागुंतीचे झाले आहे. प्रत्येक जागेवर उमेदवाराची वैयक्तिक ताकद, सहकार क्षेत्रातील संपर्क आणि त्यामागे उभे असलेले राजकीय पाठबळ यांची कसोटी लागणार आहे.

त्यामुळे ही निवडणूक केवळ पक्षीय ताकदीवर जिंकली जाईल, असे नाही; तर स्थानिक पातळीवरील समीकरणे आणि पडद्यामागील राजकीय डावपेचही निकालावर प्रभाव टाकू शकतात.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वाची संस्था आहे. शेतकरी, विविध कार्यकारी सहकारी संस्था आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांशी तिचे नाते जोडलेले असल्याने बँकेवरील नियंत्रणाला राजकीयदृष्ट्याही विशेष महत्त्व आहे. त्यामुळे संचालक मंडळातील वर्चस्वासाठी सर्वच गटांकडून प्रयत्न सुरू आहेत.

या निवडणुकीत मिळणारे यश आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी तसेच स्थानिक राजकीय आघाड्यांची ताकद तपासण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. त्यामुळे जिल्हा बँकेतील लढत ही आगामी निवडणुकांची रंगीत तालीम ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मा. मंत्री थोरातांच्या नेतृत्वात विकासाचा वेग राखणार - आ. तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्याला विकासाची आणि सुसंस्कृत राजकारणाची मोठी परंपरा आहे. प्रत्येक गावात विकासासाठी माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने निधी दिला आहे. तालुक्यात आणि शहरात मोठमोठी विकास कामे मार्गी लागली आहे. राज्यामध्ये कुठेही गेला तरी संगमनेरकर म्हणून प्रत्येक जण अभिमानाने सांगतो हे एका दिवसाचे काम नाही. अनेक दिवसांच्या परिश्रमातून हा लौकिक निर्माण झाला असून माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वात यापुढेही तालुक्याचा विकासाचा वेग कायम राखणार असल्याचे प्रतिपादन आमदार सत्यजित तांबे यांनी केले आहे.



चिकणी येथे ५७ लाख रुपये निधीतील विविध विकास कामांच्या लोकार्पण प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी रामहरी कातोरे, अजय फटांगरे, कॉ. कारभारी उगले, विलास वर्पे, भारत वर्पे, मोहनराव करंजकर, भारत शेलकर, शेतकरी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आनंद वर्पे, रमेश वर्पे, दर्शन वर्पे, सचिन वर्पे, प्रशांत वर्पे, पंकज हासे, संदीप वर्पे, राहुल मुटकुळे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार सत्यजित तांबे यांच्या हस्ते यावेळी भागवत बाबा मंदिर परिसर सुशोभीकरण, जिल्हा परिषद शाळा खोली व पशुवैद्यकीय दवाखाना संरक्षण भिंत बांधकाम या कामांचा लोकार्पण करण्यात आला.

यावेळी बोलताना आ. तांबे म्हणाले की, जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या कायमस्वरूपी पाण्यासाठी लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. आज दोन्ही कालव्यांमधून पाणी सुरू आहे. मागील ४० वर्षात स्वतःच्या कामांमधून हा तालुका उभा केला गावोगावी विकासाच्या योजना राबवल्या. प्रत्येक माणसाला सन्मान मिळून दिला. संगमनेर म्हटलं की चांगली माणसं हा लौकिक निर्माण झालेला आहे.

कोणतेही काम एका दिवसात होत नाही त्यासाठी कष्ट करावे लागतात. आपल्या सर्वांना विचारांची आणि संस्कृत राजकारणाची परंपरा आहे.

(पान ४ वर)

मुळचंद
आता आपल्या संगमनेरमध्ये
होलसेल मिल डेपो
डायरेक्ट मिल ते ग्राहक
लेडीज विअर
साडी सेक्शन
यंदाची दिवाळी मुळचंदसोबतच
मो. 7498901766
हॉटेल सेलिब्रेशन समोर, अकोले रोड, संगमनेर

# तुमच्या घरांचे उतारे तुमच्या नावावर करून देण्याची जबाबदारी माझी - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गेली चाळीस वर्षे आमदारकी, मंत्रीपद आणि विविध सत्तास्थाने असतानाही संगमनेर शहरातील संजय गांधी नगर आणि वडार वस्ती परिसरातील नागरिकांच्या घरांच्या मालकी हक्काचा व उताऱ्यांचा प्रश्न सुटू शकला नाही. निवडणुका आल्या की नागरिकांचा मतांसाठी वापर केला गेला; मात्र त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले, अशी टीका करत या परिसरातील नागरिकांच्या घरांचे उतारे त्यांच्या नावावर करून देण्यासाठी आपण सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.

शहरातील वडार वस्ती आणि संजय गांधी नगर येथील शिवसेना शाखेचे उद्घाटन आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर शिवसेनेचे शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, माजी नगरसेवक आप्पा पवार, युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख सौरभ देशमुख, समीर ओझा, प्रकाश पवार, शाखाध्यक्ष अण्णा शिंदे उपाध्यक्ष संजय शिंदे, सोमनाथ रणसुरे, कार्याध्यक्ष संपत पवार, सचिव आकाश पवार , खजिनदार सुनील पवार, संघटक दिलीप पवार, शिवसेना महिला उपजिल्हाप्रमुख दीपाली वाव्हळ यांच्यासह वडार वस्ती परिसरातील महिला पुरुष तरुण-तरुणी मोठ्या संख्येने उपस्थित होते




**संगमनेर तालुक्यातील प्रत्येक गावात, वाडी-वस्तीवर तसेच शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये शिवसेनेच्या शाखा उभारण्यात येणार आहेत. 'गाव तेथे शिवसेना शाखा आणि घर तेथे शिवसैनिक' हे अभियान राबवून या शाखांच्या माध्यमातून नागरिकांना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील. महिलांचे संरक्षण, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व बचत गटांच्या माध्यमातून त्यांच्या कुटुंबाचे अर्थकारण मजबूत करणे, यालाही प्राधान्य दिले जाईल. - आ. अमोल खताळ**

आमदार खताळ म्हणाले की, संजय गांधी नगर आणि वडार वस्ती परिसरातील नागरिक अनेक वर्षांपासून घरांच्या मालकी हक्कासह विविध समस्यांचा सामना करीत आहेत. घरांचे उतारे आणि मालकी हक्काचा प्रश्न प्रलंबित असल्याने नागरिकांमध्ये

(पान ४ वर)

हॉलमार्क प्रमाणित
PBM Jeweller's
सर्व सोन्याचे दागिने HUID हॉलमार्क प्रमाणित
घटस्थापनेच्या सोने खरेदीवर 551/- प्रति ग्रॅम मजुरी
घटस्थापनेच्या हार्दिक शुभेच्छा
*नियम व अटी लागू.
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
•विश्वास •शुध्दता •विविधता.
अशोक चौक, गुंदेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999 | 8265036807

राजपाल
खरेदी करा आणि जिंका
41 दिवस 11 लाखांची बक्षिसे
11 ऑक्टोबर - 20 नोव्हेंबर
₹11 लाखांची 1111 बक्षिसे जिंकण्याची संधी...

सणासुदीत सोन्याची खरेदी, बचतीची पर्वणी!
दिवाळी धमाका!
सर्व सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
50% पर्यंत सूट
११ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६
कमी दराच्या खात्रीसोबत मिळवा जबरदस्त ऑफर्स.....!
सर्वात कमी भाव
ओममयूर ज्वेलर्स
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
02425-225924 | 9372012044

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कंथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
24/7 Emergency Services
आजच संपर्क करा

# समृद्धी महामार्गावर गुटख्याची तस्करी उघड

## ७०.२८ लाखांचा मुद्देमाल जप्त, कोपरगावजवळ एलसीबीचा ट्रकवर छापा

युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव : राज्यात प्रतिबंधित असलेल्या गुटखा आणि सुगंधित तंबाखूची अवैध वाहतूक सुरू असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. समृद्धी महामार्गावरून गुटख्याची वाहतूक करणाऱ्या संशयित ट्रकवर अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत तब्बल ७० लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये ४५ लाख २८ हजार रुपयांच्या प्रतिबंधित गुटखा व सुगंधित तंबाखूचा, तर २५ लाख रुपये किमतीच्या ट्रकचा समावेश आहे. या कारवाईमुळे अवैध गुटखा वाहतुकीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, ट्रकचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



राज्यात गुटख्याच्या विक्री आणि वाहतुकीवर बंदी असतानाही त्याची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने कारवाईचे नियोजन केले. त्यानुसार शनिवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी कोपरगाव तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत समृद्धी महामार्गावर जाणाऱ्या संशयित ट्रकला पथकाने अडवून तपासणी केली.

पोलिसांनी ट्रकची झडती घेतली असता त्यामध्ये राज्यात प्रतिबंधित असलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखू आढळून आली. पोलिसांनी हा माल जप्त करत ४५ लाख २८ हजार रुपयांच्या प्रतिबंधित पदार्थांसह २५ लाख रुपये किमतीचा ट्रकही ताब्यात घेतला. अशा प्रकारे एकूण ७० लाख २८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला.

या प्रकरणी ट्रकचालक दिनेश रामचंद्र शर्मा (वय ४७, रा. द्वारकापुरी, इंदूर) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरुद्ध कोपरगाव तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या अवैध वाहतुकीच्या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. या पथकात पोलीस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेवदाड, पोलीस अंमलदार विजय पवार, अभिजित अर्शिकल, अरुण गांगुर्डे, रणजीत जाधव, अनिलनाथ पाखरे, विशाल तनपुरे, बाळासाहेब गुंजाळ आणि दीपक जाधव यांचा सहभाग होता.

प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक रोखण्यासाठी करण्यात आलेल्या या कारवाईत मोठ्या किमतीचा मुद्देमाल जप्त झाल्याने अवैध वाहतुकीविरोधातील पोलिसांच्या मोहिमेला महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्यात बंदी असलेल्या पदार्थांची वाहतूक आणि विक्री रोखण्यासाठी अशा कारवाया सातत्याने होणे आवश्यक असल्याची चर्चा या घटनेच्या निमित्ताने पुन्हा सुरू झाली आहे.

# संजय राऊतांचे अमित शाहांना पत्र

## ५०० कोटींच्या प्रकरणाचा तपास ईडीकडे द्या!

मुंबई (वृत्तसंस्था)

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून देणारी ऑडिओ क्लीप समोर आणली होती. ही ऑडिओ क्लीप भाजपशी संबंधित 'थिंक टँक'मधील लोकांच्या ऑनलाईन मिटिंगमधील संभाषणाची असल्याचा दावा केला जात आहे. या ऑडिओ क्लीपमध्ये मनोज जरांगे यांचे आंदोलन मोडीत काढण्याची रणनीती, श्रीकांत शिंदे यांच्याकरवी भाजपने ५०० कोटी रुपये दिल्याचा उल्लेख आहे. त्यामुळे ही ऑडिओ क्लीप समोर आल्यानंतर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली होती. मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या ५०० कोटींच्या आरोपानंतर खासदार संजय राऊत यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना एक पत्र पाठवले आहे.



हे सर्व प्रकरण पीएमएलए कायद्याअंतर्गत येत असून याचा तपास ईडीकडे सोपवण्याची विनंती संजय राऊत यांनी या पत्राद्वारे अमित शाह यांना केली आहेसंजय राऊत यांनी सोशल मीडियावर या पत्राच्या प्रतीचा फोटो शेअर केला आहे. यामध्ये संजय राऊत यांनी अमित शाह यांना म्हटले आहे की, आतापर्यंत भाजप खासदार, आमदार, राजकीय पक्ष आणि निवडणुका विकत घेत होता. आता त्यांनी आंदोलनेही विकत घ्यायला सुरुवात केली आहे. महाराष्ट्रातील ५०० कोटी रुपयांचा विषय आतापर्यंत तुमच्यापर्यंत नक्कीच पोहोचला असेल. आतापर्यंत भाजप खासदार, आमदार, राजकीय पक्ष आणि निवडणुका विकत घेत होता. आता त्यांनी आंदोलनेही विकत घ्यायला सुरुवात केली आहे. भाजपने श्रीकांत शिंदे यांच्यामार्फत मनोज जरांगे पाटील यांना द्यायला ५०० कोटी रुपये दिल्याचे सांगितले जात आहे. हे पैसे कुठून आले? आणि ते खरोखर जरांगे यांच्यापर्यंत पोहोचले की नाही? या सगळ्या प्रकरणाची चौकशी व्हायला हवी. हे प्रकरण 'प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉंडरिंग क्ट' अंतर्गत येते. कृपया या प्रकरणाचा तपास 'एनफोर्समेंट डायरेक्टोरेट' कडे सोपवावा, अशी मागणी संजय राऊत यांनी पत्रात केली आहे. आता अमित शाह संजय राऊतांच्या या पत्राला उत्तर देणार का, हे बघावे लागेल. संजय राऊत यांनी मागणी केल्याप्रमाणे अमित शाह ५०० कोटी रुपयांच्या ऑडिओ क्लीप प्रकरणाचा तपास ईडीकडे देणार का, याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

# शिर्डी विमानतळावरून हैदराबादसाठी आणखी चार उड्डाणे सुरू

## साईभक्तांसह पर्यटन आणि व्यावसायिक क्षेत्राला मोठा फायदा




युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - : साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांसाठी आनंदाची बातमी आहे. शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून हैदराबादसाठी आणखी चार विमानफेऱ्या सुरू करण्यात येत असून, त्यामुळे शिर्डी आणि हैदराबाददरम्यानची हवाई कनेक्टिव्हिटी अधिक मजबूत होणार आहे. इंडिगो विमान कंपनीमार्फत ही सेवा उपलब्ध होणार असल्याने हैदराबादसह परिसरातील साईभक्तांना शिर्डीला येणे अधिक सोयीचे होण्याची अपेक्षा आहे.

या नव्या विमानसेवेमुळे शिर्डी विमानतळावरील दररोजच्या येणाऱ्या-जाणाऱ्या विमानफेऱ्यांची संख्या आठवरून बारा होणार आहे. विमानसेवेच्या विस्तारामुळे साईनगरीच्या पर्यटन विकासाला चालना मिळण्याबरोबरच स्थानिक व्यावसायिक क्षेत्रालाही त्याचा लाभ होण्याची शक्यता आहे.

**हैदराबाद-शिर्डी प्रवास अधिक सोयीचा-** नव्या वेळापत्रकानुसार, हैदराबादहून शिर्डीकडे येणारी विमाने सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी आणि दुपारी ४ वाजता शिर्डी विमानतळावर दाखल होतील. तर शिर्डीहून हैदराबादकडे जाणारी विमाने सकाळी ८ वाजून ३० मिनिटांनी आणि सायंकाळी ४ वाजून २० मिनिटांनी उड्डाण करतील.

विमानफेऱ्यांमध्ये वाढ झाल्याने प्रवाशांना प्रवासाचे अधिक पर्याय उपलब्ध होतील. विशेषत: कमी वेळेत साईदर्शन पूर्ण करून परतणाऱ्या भाविकांसाठी तसेच कामानिमित्त प्रवास करणाऱ्या व्यावसायिकांसाठी ही सेवा उपयुक्त ठरू शकते.

पर्यटन आणि रोजगारालाही मिळणार चालना - शिर्डी हे देशातील प्रमुख धार्मिक पर्यटनस्थळांपैकी एक आहे. दरवर्षी देशाच्या विविध भागांतून लाखो साईभक्त साईबाबांच्या दर्शनासाठी येथे येतात. अशा परिस्थितीत विमानसेवेचा विस्तार हा शिर्डीच्या पर्यटन विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. हैदराबादमधून शिर्डीत येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढल्यास हॉटेल व्यावसायिक, टॅक्सीचालक, वाहनचालक, स्थानिक व्यापारी आणि पर्यटनाशी संबंधित अन्य व्यावसायिकांना फायदा होऊ शकतो. विमानतळावरील वाढती प्रवासी वाहतूक स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्यासही मदत करू शकते.

शिर्डी विमानतळावरून हैदराबादसह चेन्नई, बंगळुरू आणि दिल्ली यांसारख्या प्रमुख शहरांसाठीही विमानसेवा उपलब्ध आहे. नव्या विमानफेऱ्यांमुळे शिर्डीची हवाई वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होईल. एकूणच, शिर्डी विमानतळावरील विमानसेवेचा विस्तार हा साईभक्तांच्या सोयीसाठी आणि साईनगरीच्या पर्यटन विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरण्याची अपेक्षा आहे. आगामी काळात प्रवासी संख्येत वाढ झाल्यास शिर्डीच्या पर्यटन क्षेत्राला आणखी नवी दिशा मिळू शकते.

# मुख्यमंत्री निवासासमोर सत्याग्रह करणार : कॉ. डॉ. नवले

## किसान सभेचा मुंबईच्या दिशेने व्हेहिकल लाँग मार्च



**वर्षा बंगल्यावर वेहिकल मार्च काढू नये यासाठी पुन्हा नोटीस देण्यात आली. प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले. कारवाईची समज देण्यात आली. आम्ही तरीही थांबणार नाही आहोत. २६ ऑक्टोबर रोजी मुंबईकडे कूच करणार आहोत ! नोटिस देऊन दबाव आणण्याऐवजी मागण्या मान्य करा. तोच एकमेव मार्ग आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले : राज्यातील कष्टकरी व शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वात 'वेहिकल लाँग मार्च' आज सोमवारी अकोले शहरातून मुंबईच्या दिशेने कूच करणार आहे. हा लाँग मार्च दि. २८ ऑक्टोबर रोजी मुंबईत पोहोचून मुख्यमंत्री निवासाबाहेर सत्याग्रह सुरू करेल, अशी माहिती अखिल भारतीय किसान सभेचे केंद्रीय सहसचिव डॉ. अजित नवले यांनी दिली आहे.

डॉ. नवले यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राज्यातील कष्टकरी, श्रमिक आणि शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने २१ ऑक्टोबर २०२६ पासून दि. २५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत अकोले तहसील कार्यालयासमोर 'महामुक्काम सत्याग्रह' आयोजित करण्यात आला होता. या आंदोलनाच्या पुढील टप्प्यात आज दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजेपर्यंत राज्यभरातून शेतकरी आणि श्रमिक अकोले तालुक्यात आपल्या वाहनांसह एकत्र येत आहेत.

यानंतर अकोले शहरातून मिरवणूक काढून हा वेहिकल लाँग मार्च राजूर घोटी मार्गे मुंबईकडे रवाना होईल. आज सायंकाळी हा मोर्चा कसारा घाटाजवळील

घाटणदेवी येथे मुक्कामी थांबेल, त्यानंतर दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता शेतकरी व कामगार कसारा घाट पायी चालत उतरतील आणि पुन्हा वाहनांतून मुंबईच्या दिशेने प्रवास सुरू करतील. दि. २८ ऑक्टोबर रोजी हा लाँग मार्च मुंबईत दाखल होऊन मुख्यमंत्री निवासाबाहेर सत्याग्रह आंदोलन सुरू करणार आहे.

वेहिकल लाँग मार्चच्या प्रमुख मागण्यांमध्ये दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर 'नमो शेतकरी' योजनेचे थकलेले दोन हप्ते तातडीने वर्ग करण्यात यावेत आणि विमा संरक्षित रकमेइतकी दुष्काळ भरपाई द्यावी, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्या, 'लाडकी बहीण' योजनेचे केवायसी पुन्हा सुरू करावे, वनजमीन कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित कराव्यात, भंडारदरा धरणाचे पाणी स्थानिक आदिवासींना देण्यात यावे, याव्यतिरिक्त, थकीत पगार असलेले ३००२ पेसा मोबिलायझर कर्मचारी नियमित करण्यात यावेत, अंगणवाडीत दिल्या जाणाऱ्या आहाराचे दर वाढवून त्याची गुणवत्ता सुधारावी आणि आशा स्वयंसेविकांसह अर्धवेळ परिचरांना शासकीय सेवेत कायम करावे, या मागण्यांचा समावेश करण्यात आला आहे.

# अमृतवाहिनीत 'AiTHON 2.0'चा डंका! राष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये तामिळनाडूच्या 'टीम अल्ट्रॉन'ची बाजी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत राष्ट्रीय स्तरावर नवसंशोधनाची क्षमता सिद्ध करणारा अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा **"AiTHON 2.0'** हा राष्ट्रीय हॅकाथॉन उत्साहात संपन्न झाला. इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशनच्या (ISTE) अंतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्स विभागाने आयोजित केलेल्या या अभिनव उपक्रमात देशभरातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. तब्बल १ हजार ९७४ संघांच्या नोंदणीने या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अंतिम फेरीत तमिळनाडूतील कोईमतूर येथील डॉ. महालिंगम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या 'टीम अल्ट्रॉन'ने प्रथम क्रमांक पटकावत १ लाख ६० हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले. या स्पर्धेत विजेत्या संघांना एकूण २ लाख ५० हजार रुपयांची पारितोषिके प्रदान करण्यात आली.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी उभारलेल्या या राष्ट्रीय व्यासपीठाने नवकल्पना, संशोधनवृत्ती, तांत्रिक कौशल्य आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण काम केले. कृत्रिम बुद्धिमत्ता, सॉफ्टवेअर, हार्डवेअर आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या साहाय्याने सामाजिक तसेच औद्योगिक क्षेत्रातील समस्यांवर नावीन्यपूर्ण उपाय शोधण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली. स्पर्धेतील २३ विविध विषयांवरील आव्हानांमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आणि प्रत्यक्ष समस्या सोडविण्याच्या क्षमतेला चालना मिळाली.

**"AiTHON 2.0'** साठी देशभरातून १ हजार ९७४ संघांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६८० संघ पात्रता फेरीसाठी निवडले गेले. पुढील टप्प्यांत १०२ संघ उपांत्यपूर्व फेरीत, २० संघ उपांत्य फेरीत, तर पाच संघ अंतिम फेरीत पोहोचले. या चुरशीच्या स्पर्धेतून तमिळनाडूच्या 'टीम अल्ट्रॉन'ने अव्वल स्थान मिळविले.

## १,९७४ संघांच्या सहभागातून पाच संघ अंतिम फेरीत



संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे (DRDO) वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एल. के. गिते यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. त्यांनी या भविष्यवेधी उपक्रमाचे आणि आयोजनात पुढाकार घेणाऱ्या विद्यार्थी आयोजकांचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांनी संशोधन क्षेत्रातील संधींचा लाभ घ्यावा, स्पर्धा परीक्षांची तयारी करावी तसेच प्रशासन, खासगी क्षेत्र आणि उद्योजकतेतील करिअरच्या विविध वाटा शोधाव्यात, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

स्पर्धेतील प्रकल्पांचे मूल्यमापन पारदर्शक, निष्पक्ष आणि गुणवत्ताधारित पद्धतीने करण्यात आले. संशोधन, प्रशासन आणि खासगी क्षेत्रातील तज्ज्ञांच्या सहभागातून अंतिम फेरीतील संघांची निवड झाली. सचिन पाटील, दिप्तेश काकड, वर्षा राजगुरू, कुंदन सोनवणे, वेदश्री वामन आणि चैतन्य जोशी यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली. पारितोषिक वितरण समारंभ विभागप्रमुख डॉ. अर्चना पन्हाळकर, डॉ. विष्णू वाकचौरे आणि प्रायोजक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झाला. या वेळी विजेत्या संघांचा गौरव करण्यात आला.

स्पर्धेतील अंतिम निकाल पुढीलप्रमाणे :

प्रथम क्रमांक : टीम अल्ट्रॉन - डॉ. महालिंगम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोईमतूर, तमिळनाडू. द्वितीय क्रमांक : टीम अकाल्प - के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक. तृतीय क्रमांक : टीम १०० द - विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे. चतुर्थ क्रमांक : टीम न्यूरो हॅक - अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालय, संगमनेर. पंचम क्रमांक : टीम टेकडेव्हज़५ - आर. एम. के. अभियांत्रिकी महाविद्यालय, चेन्नई.

या राष्ट्रीय स्तरावरील आयोजनासाठी ६० स्वयंसेवक, २३ शिक्षक मार्गदर्शक, सहा विद्यार्थी आयोजक, दोन विभागप्रमुख आणि प्राचार्य यांनी समन्वयाने काम केले. देशाच्या विविध भागांतून आलेल्या ५०० हून अधिक विद्यार्थी प्रतिनिधींचा सहभाग या उपक्रमाचे विशेष आकर्षण ठरला.

विद्यार्थी आयोजक सुधांशू रहाणे, उमेश खैरनार, वेदांत मांडे, अनुष्का ढोले, मंदार कुमटकर आणि श्री उगले यांनी नियोजन, संघनोंदणी, प्रसिद्धी, प्रायोजकांशी समन्वय, तांत्रिक व्यवस्था आणि स्पर्धेच्या विविध टप्प्यांचे व्यवस्थापन यांसारख्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. विद्यार्थी नेतृत्व, संघभावना आणि नियोजनकौशल्याचा आदर्श या आयोजनातून दिसून आला.

**"AiTHON 2.0'** च्या यशस्वी आयोजनासाठी Sumago Infotech Pvt. Ltd., D-SS Chemtech Pvt. Ltd., Oakya IT Services Pvt. Ltd., Invofix Solution Pvt. Ltd., Nexa Mahalaxmi Automotives, .XYZ Domains, Bijankur Real Estate Developers, UniTech Institute, Aimers Infotech and Automation, Choudhary Estate Agency, Yuva Polyprint and Packaging Industry, Amayra Industries, Vajra Infra, दैनिक युवावार्ता, Qwicit Technologies आणि Shravya Studio यांचे सहकार्य लाभले.

संस्थेच्या विश्वस्त मा. शरयू देशमुख यांनी या उपक्रमाच्या यशाबद्दल प्राचार्य, विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संरक्षक कर्मचारी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता व डेटा सायन्स विभागातील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ, मार्गदर्शन आणि तांत्रिक संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी उभारलेल्या **"AiTHON 2.0'** ने केवळ स्पर्धेपुरते मर्यादित न राहता नवकल्पनांना चालना देणे, विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य वाढविणे आणि प्रत्यक्ष समस्यांवर तंत्रज्ञानाधारित उपाय शोधण्याचा अनुभव देणे, हा उद्देश साध्य केला. संशोधक, नवउद्योजक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील भावी नेतृत्व घडविण्याच्या दिशेने अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा हा उपक्रम महत्त्वपूर्ण टप्पा ठरला आहे.


शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com


संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# पुस्तकांशी मैत्री करा, जीवसृष्टीवर प्रेम करा

## मुलांच्या हातूनच घडणार उद्याचा भारत - चं. का. देशमुख

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- मुलांमध्ये रमण्यात मला खरा आनंद मिळतो. हीच मुले उद्याचा समर्थ भारत घडविणार आहेत. पुस्तकांच्या वाचनातूनच अनेक थोर व्यक्तिमत्त्वे घडली. म्हणून विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री केली पाहिजे. माणसाप्रमाणेच पक्षी, मुंग्या आणि इतर सजीवांनाही जगण्याचा अधिकार आहे. त्यांच्याप्रती दया आणि संवेदनशीलता बाळगली पाहिजे. याच भावनेतून मी सेवानिवृत्तीनंतर माझ्या उत्पन्नातील जास्तीत जास्त रक्कम पुस्तकांसाठी खर्च करतो, असे प्रेरणादायी विचार निरपेक्ष समाजसेवक श्री. चंद्रकांत (चं. का.) देशमुख यांनी व्यक्त केले. श्री. संत गाडगेबाबा भानुप्रभाकार सेवा प्रतिष्ठान, गोविंदनगर, संगमनेर यांच्या वतीने शनिवार, दि. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खांडगाव येथे आयोजित भव्य ग्रंथभेट व विद्यार्थी ज्ञानसंवर्धन सोहळ्यात ते बोलत होते. प्रतिष्ठानचा हा २४७ वा उपक्रम होता.



या कार्यक्रमात प्रतिष्ठानतर्फे शाळेला तब्बल ११५ पुस्तकांची अनमोल भेट देण्यात आली. सुप्रसिद्ध विज्ञानलेखक डॉ. बाळ फोंडके लिखित ‘कोण? का? कसे? कोठे? किती? काय? केव्हा?’ या सात पुस्तकांचे प्रत्येकी सात संच, अशी एकूण ४९ विज्ञानविषयक पुस्तके इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी देण्यात आली. त्याचबरोबर शालेय ग्रंथालयासाठी ६६ गोष्टींची पुस्तके भेट देण्यात आली. या ग्रंथभेटीमुळे विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना मिळणार असून वाचनसंस्कृती, कल्पनाशक्ती आणि भाषिक कौशल्यांच्या विकासाला हातभार लागणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अशोक गुंजाळ होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. दिलीप वाकचौरे, ड. सदाशिवराव थोरात, श्री. उत्तमराव देशमुख आणि श्री. पराजी जाधव उपस्थित होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती सदस्या सौ. कमलताई अरगडे, सदस्य श्री. सुनील रुपवते यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होता.

या सोहळ्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खांडगाव येथील उपक्रमशील शिक्षक, लेखक व समीक्षक श्री. अशोक शेटे यांचा त्यांच्या शैक्षणिक व साहित्यिक योगदानाबद्दल प्रतिष्ठानच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. श्री. चंद्रकांत देशमुख यांच्या हस्ते झालेला हा गौरव त्यांच्या साहित्यसेवेला मिळालेली प्रेरणादायी दाद ठरला. कार्यक्रमात पक्ष्यांसाठी बाजरी आणि मुंग्यांसाठी साखर अर्पण करून जीवदयेचा संदेश देण्यात आला. प्रत्येक सजीवाला जगण्याचा अधिकार असून त्यांच्याप्रती प्रेम, दया आणि सहअस्तित्वाची भावना जोपासली पाहिजे, हा विचार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यात आला. पुस्तकांतील ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष कृतीतून जीवनमूल्यांची शिकवण देणारा हा उपक्रम ठरला. ‘ज्ञानाचा दीप उजळूया... वाचनसंस्कृती रुजवूया!’ हा संदेश प्रत्यक्ष कृतीत उतरविणाऱ्या प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकवृंदांनी श्री. चंद्रकांत देशमुख आणि प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

# ऑडिओ क्लिप प्रकरण दाबलं तर सरकारवरच संशय - जरांगेंचा दावा

जालना (वृत्तसंस्था)

कथित ऑडिओ क्लिपमधील ५०० कोटींच्या आरोपांवरून राज्यातील राजकारण ढवळून निघालं आहे. या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील अधिकच आक्रमक झाले आहेत. सरकारने या प्रकरणाच्या खोलात गेलं पाहिजे. जर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणाचा तपास केला नाही तर यामागे हे दोन्ही नेते होते असा त्याचा अर्थ निघेल, असा दावा करतानाच आता आम्ही या प्रकरणाच्या खोलात गेलो आहोत. आमची यंत्रणाही या प्रकरणाचा तपास करणार आहे, अशी सर्वात मोठी घोषणा मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे.मनोज जरांगे पाटील यांनी मीडियाशी संवाद साधताना ही घोषणा केली आहे. मी या प्रकरणाच्या खोलात गेलो आहे. तुमची यंत्रणा काय करते ते पाहतो. आमची मराठ्याची यंत्रणा काय करते तेही दिसेल. आम्ही या प्रकरणाचा तपास करणार आहोत. ही क्लिप खोटी ठरवू, असं तुम्हाला वाटत असेल. पण अजिबात नाही. आम्ही हे होऊ देणार नाही. आम्ही याचा सोक्षमोक्ष लावल्याशिवाय राहणार नाही, असं मनोज जरांगे म्हणाले.

या क्लिपमधील बाई मोठ्या पदावर असल्याचं सांगितलं जातं. ती प्लानिंगचं मोठं नेटवर्क चालवते असं कळतंय. तिच्याकडे मी कशाला जाईल? जर मी ही क्लिप तयार केली असेल किंवा ती एआयने तयार केली असेल तर श्रीरामपूरला मर्डर झाला, संभाजी नगरला एका मुलीचं काही तरी झालं. मी हे विषय त्या क्लिपमध्ये कशाला घेईल? आम्ही फक्त त्यात आमचेच विषय घेऊ ना? मी माझंच बघेल ना? मराठा समाज आणि जनतेला सर्व कळतंय. तुम्ही काहीही म्हणा, तुम्ही पक्के



अस्वस्थ झाला आहात. तुम्ही यात गुंतला आहात. तुम्ही हे प्रकरण दाबलं तर तुमचाच हात यात होता हे सिद्ध होईल, असंही जरांगेंनी म्हटलंय५०० कोटी रुपये दिले असले तरी भाजपवाले गप्प बसणार नाही. दोन्ही पक्षात आतून खदखद आहे. शिंदेंना पैसे दिले हे ती महिला खोटं कशाला सांगेल? ती चिल्लर बाई असती, कंत्राट पद्धतीने कामाला असती तर ठिक होतं. पण ती मोठ्या पदावर आहे. ती कशाला खोटं बोलेल? आणि शिंदेंनी घेतले असेल तर ती गप्प बसणार नाही, असं सांगतानाच दोन्ही पक्षातील खदखद डेंजर आहे. आम्हाला रोज माहिती येतेय. त्यांच्या गोटात काय चाललंय हे कळतंय. शिंदेही अस्वस्थ आहेत. त्यांच्यावर आणि त्यांच्या मुलावर आरोप झाला. आपण रोष पत्करला. ठाकरेंना सोडलं. आणि आता आपल्यावर ही वेळ आणली का? असं शिंदेंना वाटत आहे. हे प्रकरण सोपं नाहीये. त्यामुळे शिंदे अस्वस्थ असतील. त्यांचं करिअर बर्बाद करण्याचा हा डाव होता, असं त्यांनी सांगितलं.

ही खोटी क्लिप नाहीये. एआयने एवढी मोठी क्लिप बनू शकत नाही. एआयच्या तज्ज्ञानेही स्पष्ट केलंय. एआय मराठीत एवढी मोठी क्लिप तयार करण्यासाठी सक्षम नाहीये, असं सांगतानाच मला सरकारने खूप त्रास दिला आहे. मी मराठ्यांचं काम करतोय म्हणून त्रास दिला. मी आंदोलनात होतो.

# हरीश दिमोटे यांना : स्व. अशोकराव तुपे पत्रकारिता पुरस्कार प्रदान

युवावार्ता (प्रतिनिधी)

लोकहक्क फाउंडेशनच्या वतीने सराला येथे आयोजित स्व. अशोकराव तुपे पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पाटील आणि न्यूज १८ वृत्तवाहिनीचे हरीश दिमोटे यांना स्व. अशोकराव तुपे पत्रकारिता पुरस्कार साहित्यिक व वरिष्ठ माध्यम सल्लागार राम दोतोंडे यांचे हस्ते गौरविण्यात आले. अध्यक्षस्थानी मानसशास्वतज्ज्ञ मनीषा निफाडे होत्या.



स्वर्गीय अशोकराव तुपे ग्रामीण भागातील शेती, शेतकरी जीवन, राजकारण आणि समाजकारण यांचे ते गाढे अभ्यासक होते. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी बँकेत एक लाख रुपयांचा निधी ठेवून त्यातून दरवर्षी पत्रकारिता पुरस्कार देण्याचा उपक्रम सुरू केल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकारितेचे महत्त्व अधोरेखित केले. मोठ्या माणसांच्या पाठीशी उभे राहणारे अनेक जण असतात; मात्र गोरगरिबांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे कमी असतात. पत्रकारितेत प्रत्येक शब्द लिहिताना मर्यादांचे भान ठेवावे लागते. पत्रकारिता म्हणजे केवळ बातमी देणे नव्हे, तर त्यासाठी परिश्रम घेऊन समाजातील शेवटच्या घटकाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करणे होय, असे ते म्हणाले.

अध्यक्षा मनीषा निफाडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. हरीश दिमोटे यांनी विचार मांडले. पुरस्कार वितरणानंतर स्व. अजितदादा संशोधन, प्रशिक्षण व विकास अकादमीत प्रशिक्षण घेतलेल्या महिलांना शिवणकला कौशल्य विकास प्रमाणपत्रांचे वितरण झाले. यावेळी कविता कानडे, डॉ. मितवा कानडे, सर्व इलेक्ट्रॉनिक मीडिया, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन भगवान राऊत यांनी केले.

# डिजिटल अरेस्टच्या नावाखाली वृध्द महिलेची फसवणूक

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - दहशतवाद्यांशी संपर्क असल्याचा आणि बँक खात्यातून त्यांना पैसे पाठविल्याचा खोटा आरोप करत, तसेच अटक वॉरंट रद्द करण्यासाठी पैसे भरण्यास सांगून सायबर भामट्याने अहिल्यानगरमधील एका वृद्ध महिलेची तब्बल ३१ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक केली. डिजिटल अरेस्टच्या नावाखाली हा प्रकार घडला असून, याप्रकरणी येथील सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावेडी उपनगरात राहणार्या महिलेने (वय ६९) याबाबत फिर्याद दिली आहे. त्यानुसार, व्हॉट्सप क्रमांकावरून संपर्क साधणार्या प्रताप (पूर्ण नाव व पत्ता माहिती नाही) नावाच्या व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ ते २२ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत फिर्यादी यांच्या व्हॉट्सप क्रमांकावर एका व्यक्तीने संपर्क साधला. आपण मुंबईतील कुलाबा पोलीस ठाण्यातून पोलीस निरीक्षक बोलत असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर फिर्यादीला डिजिटल अरेस्ट केल्याचे भासवून त्यांच्या मनात भीती निर्माण केली. तुमचा अब्दुल सलाम नावाच्या दहशतवाद्याशी संपर्क असून मुंबईतील कॅनरा बँकेच्या खात्यातून तुमच्या संपर्कातील दहशतवाद्यांना पैसे पाठविण्यात आल्याचा आरोप या व्यक्तीने केला.

या प्रकरणात तुमच्या नावाने अटक वॉरंट निघाले आहे, असे सांगून त्याने फिर्यादीला घाबरवले. अटक वॉरंट रद्द करायचे असल्यास आपण दिलेल्या बँक खात्यावर पैसे पाठवावे लागतील, असेही त्याने सांगितले. अटक होण्याच्या भीतीचा गैरफायदा घेत संबंधित भामट्याने फिर्यादी कडून एकूण ३१ लाख ७० हजार रुपये उकळले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादीने सायबर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. पोलीस निरीक्षक सागर ढिकले पुढील तपास करीत आहेत.

# एसएमबीटी हॉस्पिटलचा स्तुत्य उपक्रम

## दोन वर्षात २४ डोहाळे जेवण; मोफत १८ हजार सोनोग्राफी आणि दोन हजार महिलांच्या प्रसूती

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - ग्रामीण भागातील गरजू महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देत, माता व बालमृत्यूचे प्रमाण रोखण्यासाठी एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने एक अत्यंत दिलासादायक उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या माध्यमातून एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये गर्भवती महिलांसाठी नॉर्मल म्हणजेच प्राकृतिक प्रसूती असो वा सिझेरियन (शस्त्रक्रिया) असो, दोन्ही प्रकारच्या प्रसूती पूर्णपणे मोफत केल्या जात आहेत. केवळ प्रसूतीच नव्हे, तर गरोदरपणाच्या नऊ महिन्यांच्या काळात गर्भाची योग्य वाढ, प्रकृतीची तपासणी आणि कोणत्याही गुंतागुंतीशिवाय प्रसूती व्हावी, यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असणाऱ्या चारही सोनोग्राफी तपासण्या देखील पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत.




हॉस्पिटलच्या वतीने देण्यात आलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत ५,०००+ हून अधिक एएनसी (-छउ) रुग्ण महिलांनी प्रसूतीपूर्व सेवांचा लाभ घेतला आहे; तर माता व बालकाच्या सुरक्षेसाठी १८,०००+ हून अधिक सोनोग्राफी पूर्णपणे मोफत करण्यात आल्या आहेत.

गर्भवती महिलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी आणि त्यांना मानसिक आधार देण्यासाठी हॉस्पिटलमध्ये गेल्या दोन वर्षांपासून अनोख्या डोहाळे जेवणाचे कार्यक्रम याठिकाणी पार पडले आहेत. यादरम्यान महिलांचा आत्मविश्वास वाढवला जातो, तसेच काय काळजी घ्यायला हवी याबाबतची माहिती दिली जाते. हॉस्पिटलच्या मोफत सुविधांच्या माध्यमातून आजवर २,०००+ हून अधिक लाभार्थ्यांना थेट लाभ मिळाला आहे. केवळ वैद्यकीय उपचार करून न थांबता, एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये गर्भवती

> **मातांच्या मोफत प्रसूतीसोबतच त्यांच्या बालकांच्या आरोग्यालाही आम्ही तितकेच प्राधान्य दिले आहे. जन्मापासून ते सोळा वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींवर होणारे सर्व प्रकारचे उपचार, संसर्गजन्य आजारांवरील औषधोपचार आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा एसएमबीटीमध्ये पूर्णपणे मोफत उपलब्ध आहेत. कुपोषणमुक्तीपासून ते लहान मुलांच्या विविध आजारांवर अत्याधुनिक उपकरणांच्या साहाय्याने आणि तज्ज्ञ बालरोगतज्ज्ञांमार्फत उपचार केले जातात. बालकांचे आरोग्य निरोगी आणि सुरक्षित ठेवणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे.**
>
> **–सचिन बोरसे, संचालक, आरोग्यसेवा, एसएमबीटी हॉस्पिटल**

महिलांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी व्यापक स्वरूपात जनजागृती मोहीम राबवली जात आहे.

गर्भधारणा राहिल्यापासून ते बाळ जन्माला येईपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले जाते. यामध्ये गर्भसंस्कारांचे महत्त्व, बाळाचा बौद्धिक व मानसिक विकास, गरोदरपणात घ्यावयाची काळजी, नियमित व्यायाम, आहारविषयक समुपदेशन, उच्च जोखमीची गर्भधारणा (हाय रिस्क प्रेग्नन्सी), अकाली जन्मलेले बाळ, एनआयसीयू (छखउण) सुविधा, बालशस्त्रक्रिया, लसीकरण तसेच रक्ताल्पता (निमिया) टाळण्यासाठी आवश्यक असलेल्या सकस आहाराविषयी सविस्तर माहिती दिली जाते. बारीक-सारीक गोष्टींवर तज्ज्ञ डॉक्टरांकडून विशेष लक्ष केंद्रित केले जात असल्याने महिलांमध्ये आत्मविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सरकार गर्भवती मातांचा आणि जन्मत: बालमृत्यू रोखण्यासाठी ठोस पावले उचलत आहेत. ग्रामीण भागातील हे प्रमाण कमी करण्यासाठी एसएमबीटी हॉस्पिटलच्या वतीने नवोपक्रम राबवत हे प्रमाण कमी करण्यासाठी हातभार लावला जात आहे. या संपूर्ण लोककल्याणकारी मोहिमेला यशस्वी करण्यासाठी ठिकठीकाणी असलेल्या आरोग्यमित्रांच्या माध्यमातून हे काम अधिक प्रभावी केले जात आहे. त्यांच्या या सक्रिय सहभागामुळे आज जिल्ह्यातील शेकडो महिलांना या मोफत आरोग्य सुविधांचा थेट लाभ मिळत आहे. सामान्य कुटुंबांवर उपचारासाठी येणारा हजारो रुपयांचा कर्जाचा बोजा यामुळे टळला असून, सुरक्षित आणि आनंदी बाळंतपणाचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत आहे.


संगमनेर मेडीकल फाउंडेशन & रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित

**डॉ. इथापे इन्स्टिट्यूटऑफ फार्मसी,संगमनेर(5482)**

**वामनराव इथापे डी. फार्मसी कॉलेज,संगमनेर (5297)**

मु. वेल्हाळे, पो. राजापुर, ता. संगमनेर, जि. अहमदनगर ४२२६०५
मो. नं. 8182940940, 9764489091, 7588004890
E-Mail – ithapeinstitute2019@gmail.com
Approved by PCI, DTE, DBATU, MSBTE & Govt. of Maharashtra

**डी. फार्मसी व बी.फार्मसी प्रवेश सूचना (Spot Round)**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७प्रथम वर्ष डी. फार्मसी व बी. फार्मसीच्या संस्थास्तरावरील (Institute Level) प्रवेशाकरिता व कॅप राउंड नंतर रिक्त राहणाऱ्या (ACAP) जागांसाठी कॉलेज स्तरावरील प्रवेशाकरिता पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे.
तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली सर्व ओरीजनल कागदपत्रे घेऊन महाविद्यालयात त्वरीत संपर्क साधावा

**शैक्षणिक पात्रता – बी.फार्मसी-12 सायन्स पास, CET आवश्यक. डी.फार्मसी -12 सायन्स पास.**

| अ.क्र. | कार्यप्रणाली | बी. फार्मसी | डी. फार्मसी |
|---|---|---|---|
| 1 | ऑनलाईन अर्ज प्रवेशपत्र स्विकारणे | 29/09/2026 ते 28/10/2026 | 25/10/2026 ते 28/10/2026 |
| 2 | नोंदणीकृत उमेदवारांकडून अर्ज मागविण्याची अंतिम तारीख | 28/10/2026 up to 3.00 pm | 28/10/2026 up to 5.00 pm |
| 3 | गुणवत्ता यादी तयार करून ती कॉलेजच्या वेबसाइटवर आणि संस्थेच्या सूचनाफलकावर प्रदर्शित करण्याची अंतिम तारीख | 28/10/2026 up to 5.00 pm | 29/10/2026 up to 5.00 pm |
| 4 | प्रवेश घेण्याची अंतिम तारीख | 29/10/2026 up to 5.00 pm | 30/10/2026 up to 5.00 pm |

**अध्यक्ष**
संगमनेर मेडीकल फाउंडेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, संगमनेर

# संपादकीय...

## भूकमारीचे जागतिक संकट लाखो लोक अन्नापासून वंचित!

जगाने विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग आणि शेतीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. मात्र, आजही जगातील अनेक लोकांना दोन वेळचे अन्न मिळत नाही. एका बाजूला मोठ्या प्रमाणावर अन्नाची नासाडी होत आहे, तर दुसऱ्या बाजूला अनेक कुटुंबांना उपाशीपोटी झोपावे लागत आहे. ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक असून भूकमारीची समस्या आजही जगासमोर मोठे आव्हान बनली आहे. भूकमारी म्हणजे पुरेसे अन्न न मिळाल्यामुळे निर्माण होणारी गंभीर परिस्थिती. शरीराला आवश्यक असणारे अन्न आणि पोषक घटक मिळाले नाहीत, तर आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. विशेषतः लहान मुले, महिला, वृद्ध व्यक्ती आणि गरीब कुटुंबांना या समस्येचा अधिक सामना करावा लागतो. लहान मुलांना पुरेसे पोषण न मिळाल्यास त्यांची शारीरिक आणि मानसिक वाढ योग्य प्रकारे होत नाही. रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे विविध आजारांचा धोकाही वाढतो. भूकमारीच्या समस्येमागे गरिबी, बेरोजगारी, वाढती महागाई आणि अन्नधान्याचे असमान वितरण ही प्रमुख कारणे आहेत. अनेक लोकांकडे रोजगार नसल्यामुळे त्यांना कुटुंबाच्या मूलभूत गरजाही पूर्ण करता येत नाहीत. बाजारात अन्नधान्य उपलब्ध असले, तरी वाढत्या किमतींमुळे ते खरेदी करणे अनेकांना कठीण जाते. आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे अनेक कुटुंबांना पुरेसा आणि पौष्टिक आहार मिळत नाही. नैसर्गिक आपत्तीमुळेही भूकमारीची समस्या गंभीर बनते. दुष्काळ, अतिवृष्टी, पूर आणि अवकाळी पाऊस यांचा शेती उत्पादनावर परिणाम होतो. पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी होते. अन्नधान्याचे उत्पादन घटल्यास त्याचा परिणाम बाजारभावावर आणि सामान्य नागरिकांच्या जीवनावर होऊ शकतो. हवामानातील बदलांमुळे भविष्यात अन्नसुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून येथे मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन होते. तरीही देशातील अनेक भागांमध्ये कुपोषण आणि अन्नसुरक्षेच्या समस्या दिसून येतात. गरीब कुटुंबे, स्थलांतरित मजूर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना अनेकदा पुरेसे अन्न मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. सरकारकडून सार्वजनिक वितरण व्यवस्था, शालेय पोषण आहार आणि अंगणवाडी सेवांच्या माध्यमातून नागरिकांना मदत केली जाते. मात्र, या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र व्यक्तीपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. अन्नाची नासाडी हे भूकमारीच्या समस्येतील महत्त्वाचे आव्हान आहे. लग्नसमारंभ, हॉटेल्स, कार्यक्रम आणि घरांमध्ये अनेकदा मोठ्या प्रमाणात अन्न वाया जाते. हेच अन्न योग्य नियोजनाद्वारे गरजू लोकांपर्यंत पोहोचवता येऊ शकते. प्रत्येकाने गरजेपुरते अन्न घ्यावे आणि अन्नाची नासाडी टाळावी. सामाजिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांनीही गरजू नागरिकांना अन्न उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घ्यावा. भूकमारीची समस्या दूर करण्यासाठी रोजगारनिर्मिती, गरिबी कमी करणे, शेतकऱ्यांना मदत करणे आणि अन्नधान्याचे योग्य वितरण करणे आवश्यक आहे. शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देणे, अन्नधान्याची योग्य साठवणूक करणे आणि सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. त्याचबरोबर मुलांना आणि महिलांना पौष्टिक आहार मिळण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. भूकमारी ही केवळ आर्थिक समस्या नसून सामाजिक जबाबदारीचा विषय आहे. प्रत्येक व्यक्तीला पुरेसे आणि पौष्टिक अन्न मिळणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाने यासाठी प्रयत्न केले, तर भूकमारी कमी करण्यास मदत होऊ शकते. अन्नदान, अन्नाची नासाडी रोखणे आणि गरजू लोकांना मदत करणे या छोट्या कृतीही महत्त्वपूर्ण ठरू शकतात. शेवटी, भूकमारीमुक्त समाज निर्माण करणे ही शासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. अन्न हे प्रत्येकाच्या जीवनासाठी आवश्यक आहे. त्यामुळे कोणालाही उपाशी राहण्याची वेळ येऊ नये, यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्नाची नासाडी थांबवून आणि गरजूंपर्यंत अन्न पोहोचवूनच आपण भूकमारीच्या समस्येवर मात करू शकतो. भूकमारीच्या समस्येवर मात करण्यासाठी जनजागृती करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून अन्नाचे महत्त्व, पोषण आणि अन्नाची बचत याविषयी नागरिकांना माहिती दिली पाहिजे. शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या अन्नधान्याची योग्य साठवणूक करण्यासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच, गरजू कुटुंबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्यास त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. शासनाने अन्नसुरक्षा योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून कोणतेही कुटुंब अन्नापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.

# शिक्षणशास्त्र महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- (प्रतिनिधी) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथील विद्यार्थी विकास मंडळाच्या अंतर्गत शिक्षण प्रसारक संस्थेच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर येथे शनिवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०२६ रोजी 'निर्भय कन्या अभियान' हा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिक, संविधानाने दिलेले मानवी हक्क व अधिकार, महिला सुरक्षेसाठी असणारे कायदे, सुरक्षितता, आत्मविश्वास आणि सजगतेविषयी मार्गदर्शन करून निर्भय कन्या अभियानाचा प्रारंभ केला यावेळी प्राचार्या सविता घुले, प्राचार्य भालचंद्र भावे, समन्वयक डॉ. मेस्त्री ज्योती व एक्युआयसीचे प्रमुख डॉ. राजू शेख उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात श्री. दत्ता भांदुर्गे यांनी विद्यार्थिनींना स्वतःचे संरक्षण कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विविध स्वसंरक्षण तंत्रांचे प्रात्यक्षिक सादर केले. आत्मविश्वासाने परिस्थितीचा सामना करणे यांचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी ब्लॅक बेल्ट विजेत्या संस्कृती ढोले आणि यज्ञा भावसार यांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन करून प्रात्यक्षिकात सहभाग घेतला. दुस-या सत्रात विधीतज्ञ डॉ. ममता वर्मा यांनी भारतीय संविधानाने प्रदान केलेले मानवी हक्क व मूलभूत अधिकार यांविषयी मार्गदर्शन केले. कायदे, कायदेशीर तरतुदी, महिलांचे अधिकार आणि अन्याय अथवा छळाच्या प्रसंगी उपलब्ध असणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. प्रेरक व्याख्याते व लेखक स्मिता गुणे यांनी मुलींची सुरक्षितता, आत्मविश्वास आणि सजगता या विषयांवर मार्गदर्शन करून महिला व मुलींनी अन्यायाविरूद्ध आवाज उठवणे आवश्यक आहे असे त्यांनी आपल्या व्याख्यानातून नमूद केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थीनी प्राची पाबळ, प्रास्ताविक रोहिणी गाडेकर, परिचय मयुरी मेंगाळ व आभार प्रदर्शन अर्पणा कुलकर्णी यांनी केले. यावेळी बी.एड्. व डि.एड्. प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालपाणी विद्यालयाचे रिंग टेनिस स्पर्धेत जिल्ह्यावर वर्चस्व; तीनही संघ विजेते



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांचा, १४ वर्षांखालील मुलींचा आणि १७ वर्षांखालील मुलींचा अशा तीनही संघांनी जिल्हास्तरीय शालेय रिंग टेनिस स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत जिल्हा विजेतेपद पटकावले. या तिन्ही संघांची विभागीय स्तरावरील शालेय रिंग टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संगमनेर महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर नुकत्याच झालेल्या या स्पर्धेत दहा शाळांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत मालपाणी विद्यालयाच्या १४ वर्षांखालील मुलांच्या, १४ वर्षाखालील मुलींच्या तसेच १७ वर्षांखालील मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत जिल्हा विजेतेपद पटकावले. या तिन्ही संघांनी मिळवलेले यश विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेत भर घालणारे ठरले आहे. विभागीय स्तरावरील स्पर्धेतही हे संघ नक्कीच उत्कृष्ट कामगिरी करतील

विजेत्या खेळाडूंना क्रीडा शिक्षिका तथा पर्यवेक्षिका रंजना पवार, सुनील आढळ तसेच मार्गदर्शक बाबा गायकवाड आणि राजेंद्र थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा सुवर्णाताई मालपाणी, संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक तसेच तालुक्यातील क्रीडाप्रेमींनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले असून, विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी दिल्या आहेत .

पान १ वरून

# मा. मंत्री थोरातांच्या...

राजकारण हे गोरगरिबांच्या विकासासाठी करायचे असते हे सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी संस्कार आपल्या सर्वांना दिली आहेत. चिकणी मध्ये अनेक विकास कामे केली आहेत. यादी काढली तर खूप मोठी होईल आणि हे गावातील सर्व जनतेला माहित आहे. यापुढील काळातही लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली हा विकासाचा वेग कायम राखले जाईल असे ते म्हणाले. रामहरी कातोरे म्हणाले की, प्रत्येक गावामध्ये माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या माध्यमातून विकास कामे झाली आहेत. तालुक्यासाठी निळवंडे धरण विविध वैभवशाली इमारती गावोगावी रस्त्यांचे जाळे बंधाऱ्यांचे जाळे असे अनेक कामे सांगता येतील. तरुणांना विनंती आहे की काही मंडळी जाती धर्माच्या नावावर द्वेष पसरत आहे.त्याला बळी पडू नका. कॉम्रेड कारभारी उगले म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श संस्कारातून आणि शिस्तीमधून हा तालुका घडला आहे. माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी या तालुक्याचे नेतृत्व करताना प्रत्येकाच्या जीवनात आनंद निर्माण केला. सत्ता येते आणि जाते मात्र लोकनेता कायम जनतेत असतो. हा काळ लवकर बदलेल. सर्वांनी माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या पाठीशी कायम उभे राहावे असे आवाहन त्यांनी केले. आनंद वर्पे म्हणाले की, आता तरुण पिढी भाजपच्या विरोधात उभी राहिली आहे. धर्मपंथ, यापेक्षा बेरोजगारी, महागाई, नोकऱ्यांचा प्रश्न, शेतकऱ्यांचा प्रश्न, कर्जमाफी यावर सरकारने बोलले पाहिजे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आनंद वर्पे यांनी, सूत्रसंचालन प्राध्यापक संदीप थोरात यांनी केले तर भारत वर्पे यांनी आभार मानले.

# तुमच्या घरांचे उतारे तुमच्या...

असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या नागरिकांना त्यांच्या हक्काचे घर मिळावे आणि त्यांच्या घरांच्या नोंदी त्यांच्या नावावर व्हाव्यात, यासाठी आपण पुढाकार घेतला आहे. नागरिकांनी आपल्यावर दाखविलेला विश्वास सार्थ ठरवून हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा सुरूच राहील, असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी या पूर्वी ही तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात आला होता. मुंबईत यासंदर्भात बैठकही घेण्यात आली होती. तत्कालीन जिल्हाधिकारी अनिल कवडे यांनी स्वतः या भागाची पाहणी केली होती. नागरिकांना न्याय मिळावा व त्यांच्या घरांच्या मालकी हक्काबाबत योग्य निर्णय व्हावा, या साठी आपण प्रयत्नशील आहे. संगमनेरमध्ये राजकीय परिवर्तन झाल्यानंतर सामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधान दिसू लागले आहे. नागरिकांच्या मनातील भीती दूर करून त्यांना सन्मानाने जगता यावे, यासाठी आपण काम करीत आहोत. आपणही सामान्य कुटुंबातून पुढे आलो असल्याने सर्वसामान्यांच्या अडचणींची जाणीव आहे. त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कटिबद्ध राहू, असेही आ. खताळ यांनी सांगितले.

## निविदा सूचना

**रोटरी आय केअर ट्रस्ट**
**नगरपालिका कंपाऊंड,संगमनेर,जि. अहिल्यानगर**
**तळमजला नूतनीकरण कामासाठी निविदा मागविणेबाबत**

रोटरी आय केअर ट्रस्टच्या इमारतीच्या तळमजल्यावरील नुतनीकरण कामाकरिता अनुभवी व पात्र कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. प्रत्येक कामासाठी त्या- त्या विषयातील तज्ञ वेगवेगळे ठेकेदार नेमायचे आहे. सर्व मिळून कामाचा अंदाजे खर्च रु. 30 लाख आहे.

**कामाचे स्वरूप :**

१. विद्यमान बांधकामाचे तोडकाम करणे : मंजूर नकाशात दर्शविल्याप्रमाणे विद्यमान आवश्यक बांधकाम काळजीपूर्वक पाडणे. निघालेला सर्व मलबा व साहित्य जागेबाहेर वाहून नेऊन योग्य विल्हेवाट लावणे.
२. किरकोळ सिव्हिल कामे करणे : विटांची भिंत बांधणे,आतील व बाहेरील प्लास्टर करणे,आर.सी.सी. काम करणे. आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्तीची कामे करणे.
३. संपूर्ण परिसराचे पेस्ट कंट्रोल करणे.
४. फरशी (Flooring and cladding) पुरवून बसविणे.
५. प्लायवूड व लॅमिनेट फिनिशसह फर्निचर तयार करणे व बसविणे.
६. काचेचे (टफन ग्लास) पार्टिशन करणे व बसविणे.
७. जुने इलेक्ट्रिकल वायरिंग काढून नवीन वायरिंग करणे. स्विचेस, पॉइंट्स, डी.बी., फॅन, डेकोरेटीव लायटिंग, फिटिंग इत्यादी कामांसह.
८. पी.ओ.पी. सिलिंग करणे.
९. आतील व बाहेरील रंगकाम करणे.
१०. संपूर्ण प्लंबिंगची कामे करणे,पाणीपुरवठा व ड्रेनेज लाईनची कामे.
११. कॉम्पुटर, लॅन, नेट वर्किंग, वायरिंग, PAS सिस्टिम, बायो मशीन इत्यादि सर्व हार्डवेअरसह कामे.
१२. लिफ्टसाठी लागणारे फौन्डेषणसह लोखंडी स्ट्रक्चर तयार करणे.
१३. दोन मजल्यासाठी लिफ्ट बसविणे.

**निविदा अटी**

कामाची प्रत्यक्ष पाहणी करूनच दरपत्रक सादर करावे.
सर्व कामे दर्जेदार साहित्य वापरून व संस्थेच्या सूचनांनुसार करावीत.
निविदेमध्ये जीएसटी व इतर सर्व करांचा स्वतंत्र उल्लेख करावा.
काम पूर्ण करण्याचा कालावधी एक महिना राहील.
संस्थेला कोणतीही किंवा सर्व निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार राहील.
निविदा सादर करण्याची अंतिम तारीख: ०२.११.२०२६

**संपर्क : मॅनेजर, रोटरी आय केअर ट्रस्ट,नगरपालिका परिसर, संगमनेर मो. ९६२३८३८२९६**


## श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी

मु.माळवाडी पी.बोटा ता.संगमनेर जि.अहिल्यानगर ४२२६०२
मो.नं.7588094642/43 shrisamarthcop@gmail.com
Approved by PCI,DTE,DBATU,MSBTE & Govt.of Maharashtra

**प्रथम वर्ष डी. बी आणि एम फार्मसी प्रवेश सूचना (2026-27) Spot Round**
शैक्षणिक पात्रता: 1.D.Pharm: Pass in12`th Science, 2.B.Phrm: Non Zero Score in CET+ Pass in 12th Science 3.M.Pharmacy: Non Zero Score in GPAT+Pass in B.Pharm

प्रथम वर्ष डी.बी आणि एम फार्मसी वर्षाच्या वर्षाच्या संस्थात्मक प्रवेशासाठी व नंतर रिक्त राहणाऱ्या जागांसाठी महाविद्यालय स्तरावरील प्रवेश प्रक्रिया फार्मसी कान्सिल ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य व शासनाच्या नवीन नियमानुसार भरण्यात येईल तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपली सर्व शैक्षणिक कागदपत्रे घेऊन महाविद्यालयात त्वरित संपर्क साधावा.

| अ.क्र. | कार्यपद्धती | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष बी आणि एम फार्मसी | प्रथम वर्ष डी फार्मसी |
| १. | कॉलेजस्तरावर अर्ज आणि प्रवेश पत्र स्वीकारण | 25/10/2026 ते 28/10/2026 | 26/10/2026 ते 28/10/2026 |
| २. | अंतिम गुणवत्तायादी | 28/10/2026 दुपारी 5:00 pm | 29/10/2026 दुपारी 1:00pm |
| ३. | प्रवेश घेण्यासाठी अंतिम तारीख | 29/10/2026 | 30/10/2026 |
| ४. | निवड झालेल्या विद्यार्थांचे 2026-27 शैक्षणिक वर्षाकरिता प्रवेश व नोंदणीची अंतिम तारीख | 29/10/2026 | 30/10/2026 |

प्रचार्य
श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी



**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
PARVEEN SHAIKH QAMRODDIN
NEW NAME AS
PARVIN IRFAN SHAIKH
ADD – 1399,MOTHI MASHID SAMOR , MAN MANDIR JANRAL STOARS MOMINPURA , SANGAMNER , TAL- SANGAMNER DIST -AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
NAJMIN ABDUL GANI SHAIKH
NEW NAME AS
NAJMIN ANSAR SHAIKH
ADD – PANDHARI MALA , AT POST KURAN, SANGAMNER , TAL- SANGAMNER DIST - AHMEDNAGAR

**पाहिजेत**
सेल्समन
(महिला/ युवती प्राधान्य)
लिरा द कॉस्मेटिक्स झोन
वृंदावन अपार्टमेंट, गणेश नगर
मो. 7499630747

**पाहिजेत**
ऑफिसबॉय ( शिपाई )
02 जागा (पुरुष )
शैक्षणिक पात्रता - 10/12 वी पास
वय मर्यादा - 20 ते 40 वर्ष
इच्छुकांनी संस्था कार्यालयात लेखी अर्जासह कागदपत्र दिनांक 26/10/2026 पर्यंत जमा करावे
महेश नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अशोक चौक, संगमनेर
फोन नं. 02425-220777
9623017997
Email- mahesh.patsanstha@gmail.com

**कामगार भरती**
अकाउंटंट - ०१ (स्त्री/पुरूष)
स्त्री/ पुरूष, टॅलीचे ज्ञान आवश्यक
सेल्समन- ०५ (पुरूष)
अनुभवी, संभाषण कौशल्य आवश्यक
वॉचमन- ०१
ठिकाण – रमेश डिपार्टमेंटल स्टोअर्स अशोक चौक, संगमनेर
9028342110
9262625962

**पाहिजेत**
SR THORAT
मार्केटिंग वाहतूक गाड्यांची आवश्यक
आमच्या प्रतिदिन दूध .पॅकिंग व दुग्धजन्य पदार्थ करिता संगमनेर तालुका व आसपासच्या परिसरा मध्ये मार्केटिंग कामासाठी खालील प्रकारच्या इन्सुलेटेड गाड्यांची आवश्यकता आहे. साधारण ५०० किलो पर्यंत माल असेल

| १.क्रं | गाडीचा प्रकार |
|---|---|
| १ | छोटा हत्ती |
| २ | टाटा झिप |
| ३ | महिंद्रा जीतो |
| ४ | मारुति सुजुकी सुपर कॅरि |

सदर गाडी मालकांनी ऑफिस मध्ये गाडीच्या कागदपत्रासह समक्ष भेटणे. कंपनी कामकाज वेळेत रविवार सोडून. कामासंबधी सर्व अटी व शर्ती कंपनी नियमप्रमाणे राहतील. या संदर्भात आवश्यक ती माहिती कंपनी कार्यलयात मिळेल.
ऑफिस– एस.आर.थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा. लि. राजापूर रोड. संगमनेर मो.९८६०१००९३६/९३७




**भाड्याने देणे आहे**
टॉप टेन इम्पेरिअल ( रिलायन्स डिजीटल) मध्ये ग्राउंड फ्लोअरचे दोन शॉप किंवा ऑफिस भाड्याने देणे आहे
- संपर्क -
9730380303
9552690909

**पाहिजेत**
मे.साईराज सेल्स कॉर्पोरेशन
Exide battery sales & services (Sangamner)
कॉम्प्युटर ऑपरेटर - १ जागा
(टॅलीचे ज्ञान आवश्यक)
बॅटरी विषयी माहिती असलेला - 1जागा
संपर्क क्रमांक:
9822312490

# संगमनेर खुर्दमध्ये दोन गटांत सशस्त्र हाणामारी

## चॉपर, फायटरसह लोखंडी-लाकडी दांडक्यांचा वापर; परस्परविरोधी फिर्यादींवरून गुन्हे दाखल

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : किरकोळ बाचाबाची आणि पूर्ववैमनस्यातून संगमनेर खुर्द येथे दोन गटांत सशस्त्र हाणामारी झाल्याची घटना गुरुवारी (दि. २२) घडली. चॉपर, फायटर, लोखंडी व लाकडी दांडक्यांसह लाथाबुक्क्यांनी एकमेकांवर हल्ले केल्याचे आरोप दोन्ही बाजूंनी करण्यात आले आहेत. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, परस्परविरोधी फिर्यादींवरून संगमनेर शहर पोलिसांनी एकूण १२ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून, वृत्त लिहिपर्यंत या प्रकरणात कोणालाही अटक करण्यात आलेली नव्हती.


एआय फोटो

### चौकातील बाचाबाची; दोघांविरुद्ध पहिली फिर्याद

या प्रकरणी कासीम इक्बाल सय्यद (वय ३५, रा. डाकेमळा, संगमनेर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास संगमनेर खुर्द येथील चौकात मोसीन गुलाब शेख (रा. डाकेमळा) आणि तवीश ऊर्फ गुड्डू शेख (रा. रहेमतनगर) यांनी त्यांना मारहाण केली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, दुसऱ्या गटाकडूनही पोलिसांत फिर्याद देण्यात आली आहे. मोसीन गुलाब शेख (वय ३८, रा. नायकवाडपुरा, संगमनेर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पानटपरीवरून निघून जाण्यास सांगितल्याच्या रागातून गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास त्यांच्यावर हल्ला करण्यात आला.

या हल्ल्यात कासीम सय्यद याच्यासह शोएब ऊर्फ भोल्या कय्यूम पठाण (रा. नायकवाडपुरा), मुदस्सर सय्यद, इक्बाल सय्यद, मुस्तकीन सय्यद (तिघेही रा. आर. के. प्लॉट), अज्जू इक्बाल सय्यद (रा. उम्मतनगर), अकिल सय्यद (रा. रहेमतनगर), बालम सय्यद आणि त्याची नावे नमूद नसलेली दोन मुले, अशा दहा जणांचा सहभाग असल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या तक्रारीवरून संबंधित दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पोलिसांकडून तपास सुरू

एकाच दिवसात घडलेल्या या दोन घटनांमुळे संगमनेर खुर्द परिसरात चर्चेला उधाण आले आहे. दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध तक्रारी दाखल केल्याने पोलिसांकडून घटनेची चौकशी सुरू आहे. पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी टोपे आणि डुंबरे या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

# राहुल गांधी मानहानी प्रकरणात निर्दोष

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह मानहानी प्रकरणात काँग्रेस नेते राहुल गांधी यांना मोठा दिलासा मिळाला आहे. अमित शाह यांच्यावर केलेल्या टिप्पणीच्या प्रकरणात राहुल गांधी यांची निर्दोष सुटका झाली आहे. सुल्तानपुर न्यायालयाने सोमवारी राहुल गांधी यांची निर्दोष सुटका केली. राहुल गांधी यावेळी न्यायालयात उपस्थित होते. २०१८ साली भाजप नेते विजय मिश्र यांनी याचिका दाखल केली होती. आधी हे प्रकरण सिविल कोर्टात मग एमपी-एमएलए कोर्टात गेलं. एमपी-एमएलए कोर्टाचे मॅजिस्ट्रेट शुभम वर्मा यांनी निकालाच्या दिवशी राहुल गांधी यांना उपस्थित रहायला सांगितलं होतं.



मे २०१८ मध्ये कर्नाटक विधानसभा निवडणूक प्रचारादरम्यान राहुल गांधी यांनी बंगळुरुमध्ये एक पत्रकार परिषद आयोजित केली होती. त्यावेळी राहुल गांधींनी भाजपचे तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष आणि वर्तमान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याबद्दल टिप्पणी केली होती. राहुल गांधींच्या या टिप्पणीला मानहानीकारक ठरवून भाजपं नेते आणि सुल्तानपूर जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष विजय मिश्रा यांनी ४ ऑगस्ट २०१८ रोजी राहुल गांधींविरोधात याचिका दाखल केली होती.कोर्टात सुनावणी झाल्यानंतर २७ नोव्हेंबर २०२३ रोजी राहुल गांधी यांना आरोपी मानून समन जारी करण्यात आलेलं. २० फेब्रुवारी २०२४ रोजी राहुल गांधी स्वत: सुल्तानपूर कोर्टात हजर राहिले. त्यांना २५-२५ हजार रुपयांच्या दोन मुचलक्यांवर जामिन मंजूर झालेला. राहुल गांधी यांनी हे आरोप फेटाळून लावताना हे सत्ताधारी पक्षाचं कारस्थान असल्याचं म्हटलं होतं. न्यायालयाने सुनावणी दरम्यान तक्रारदार विजय मिश्रा, अनिल मिश्रा आणि रामचंद्र दुबे तीन साक्षीदारांच्या जबानी नोंदवल्या.

# वृक्षतोडी ऐवजी पयार्याय शोधावा - सुधीर मुनगंटीवार

मुंबई (वृत्तसंस्था)

भीमाशंकरच्या जंगलात वृक्षतोडीवरून राज्यात वाद पेटला असताना भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आवश्यक नसताना कोणतीही वृक्षतोड करू नये हीच वनविभागाची आणि केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाची भूमिका असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, सरकारची अधिकृत माहिती जर वृक्षतोडीच्या संदर्भात वृक्ष तोडण्याबाबत नसेल, तर निश्चितपणे संवादातून मार्ग निघाला पाहिजे. आवश्यक नसताना कोणतीही वृक्षतोड करू नये, ही राज्याच्या वनविभागाची साधारणता भूमिका असते. आणि केंद्र सरकारच्याही पर्यावरणाची भूमिका याच पद्धतीची असते. आपल्याला साईट स्पेसिफिक हा शब्द वापरला जातो. जर दुसऱ्या साईटवर एखादं काम करता येत असेल, तर जंगल नष्ट होण्यापासून वाचवलं पाहिजे. पण या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितलं आहे की, कोणत्याही पद्धतीची वृक्षतोड होणार नाही.दरम्यान, भीमाशंकर अभयारण्य परिसरात टोरेंट कंपनीच्या पंप स्टोरेज प्रोजेक्टसाठी ३२ हजार झाडं तोडण्याची परवानगी मिळाल्याचा आरोप मनसे आणि पर्यावरणवाद्यांनी केला आहे. या ठिकाणी १५०-२०० वर्षे जुनी झाडं तोडली जात असून विदारक दृश्य असल्याचे फोटो आणि व्हिडिओ समोर आले आहेत.

# ‘चंद्रचूड सरकारसमोर गरजेपेक्षा अधिक मवाळ राहिले

## माजी न्यायमूर्ती कौल यांची टीका! न्यायपालिकेच्या स्वायत्ततेवरून नवा वाद

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या कार्यपद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती संजय किशन कौल यांनी टीका केल्याचे वृत्त समोर आले आहे. न्यायाधीशांच्या नियुक्त्या, केंद्र सरकारशी सल्लामसलत आणि न्यायवृंदाच्या निर्णयप्रक्रियेवरून त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांमुळे न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. चंद्रचूड यांच्याकडे बौद्धिक क्षमता, विषयाची सखोल समज आणि कठोर परिश्रम करण्याची तयारी होती; मात्र सरकारशी व्यवहार करताना त्यांनी गरजेपेक्षा अधिक मवाळ भूमिका घेतल्याचे मत कौल यांनी व्यक्त केल्याचे वृत्तात म्हटले आहे.

न्यायपालिकेचे स्वातंत्र्य हे लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. न्यायाधीशांच्या नियुक्त्यांमध्ये सरकारची भूमिका कितपत असावी, तसेच न्यायवृंदाच्या शिफारशींबाबत निर्णय घेताना न्यायपालिकेने किती स्वायत्तता राखावी, हे प्रश्न या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आले आहेत.

सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या रिक्त पदांवरील नियुक्त्यांसंदर्भात झालेल्या न्यायवृंदाच्या बैठकीचा उल्लेख या प्रकरणात करण्यात आला आहे. उपलब्ध वृत्तानुसार, सहा रिक्त पदांवरील नियुक्त्यांच्या प्रक्रियेत पाच नावांबाबत सहमती झाली होती. मात्र, तत्कालीन सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी सहाव्या नावाचा प्रस्ताव मांडला आणि त्यासंदर्भात सरकारची भूमिका जाणून घेण्याचा विचार केला होता, असे कौल यांनी आपल्या आत्मचरित्रात नमूद केल्याचे सांगितले जाते.



या प्रक्रियेच्या अनुषंगाने सरकारशी सल्लामसलत करणे आणि न्यायवृंदाच्या शिफारशींसाठी सरकारची संमती घेणे, या दोन वेगळ्या बाबी असल्याचा मुद्दा कौल यांनी अधोरेखित केल्याचे वृत्तात नमूद आहे. न्यायाधीशांच्या नियुक्त्यांमध्ये न्यायपालिकेची स्वतंत्र निर्णयक्षमता कायम राहणे आवश्यक असल्याची भूमिका या चर्चेतून पुढे येत आहे. या मुद्द्यावर काँग्रेसनेही टीका केल्याचे वृत्त आहे. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी न्यायपालिकेच्या स्वातंत्र्याबाबत प्रश्न उपस्थित केल्याचे सांगितले जाते. संविधानाचे रक्षण करणारी न्यायपालिका सत्ताधाऱ्यांच्या दबावापासून मुक्त असणे आवश्यक आहे, अशी भूमिका काँग्रेसकडून मांडण्यात आली आहे. न्यायपालिकेच्या निर्णयप्रक्रियेत सरकारी हस्तक्षेपाची शक्यता, नियुक्त्यांमधील पारदर्शकता आणि न्यायवृंदाच्या अधिकारांचे संरक्षण या मुद्द्यांवरून राजकीय वर्तुळातही चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या संदर्भातील प्रत्येक आरोप आणि संबंधित व्यक्तींची भूमिका स्वतंत्रपणे तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे.

न्यायपालिका आणि सरकार यांच्यातील संबंध हा भारतीय लोकशाहीतील संवेदनशील विषय आहे. सरकारशी आवश्यक प्रशासकीय संवाद साधताना न्यायपालिकेने आपले घटनात्मक स्वातंत्र्य अबाधित राखणे अपेक्षित असते. त्यामुळे माजी न्यायमूर्ती कौल यांनी उपस्थित केलेले मुद्दे केवळ दोन न्यायिक व्यक्तिमत्त्वांमधील मतभेदांपुरते मर्यादित नसून, न्यायाधीशांच्या नियुक्त्या आणि न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेच्या व्यापक चर्चेशी संबंधित आहेत.

चंद्रचूड यांच्या कार्यपद्धतीवर झालेली ही टीका, काँग्रेसने उपस्थित केलेले प्रश्न आणि न्यायवृंदाच्या निर्णयप्रक्रियेबाबत सुरू झालेली चर्चा यामुळे न्यायपालिकेचे स्वातंत्र्य, घटनात्मक संस्थांची स्वायत्तता आणि सत्तेच्या संतुलनाचा मुद्दा पुन्हा एकदा केंद्रस्थानी आला आहे.

## दिनविशेष

३१२: — कॉन्स्टन्टाइन द ग्रेट यांना विजन ऑफ द क्रॉस प्राप्त झाले असे म्हटले जाते.
१९९१: — तुर्कमेनिस्तानला रशियापासुन स्वातंत्र्य मिळाले.
१९८६: — युनायटेड किंगडमने आर्थिक बाजारपेठांवरील सर्व निर्बंध काढुन टाकले.
१९७१: — डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो या देशाचे नाव बदलुन झैरे असे करण्यात आले.
१९६१: — मॉरिटानिया आणि मंगोलियाचा संयुक्त राष्ट्रांत (United Nations) मध्ये प्रवेश.
१९५८: — पाकिस्तानमध्ये जनरल अयुब खानने लश्करी उठाव करून राष्ट्राध्यक्ष इस्कंदर मिर्झा यांना पदच्युत केले.

## जन्म

५७३: अबू बक्र — रशीदुन खलीफाचे पहिले खलिफा (निधन: २३ ऑगस्ट ६३४ )
१९८४: इरफान पठाण — भारतीय क्रिकेटपटू
१९७७: कुमार संगकारा — श्रीलंकेचे क्रिकेटपटू
१९७६: मनीत चौहान — भारतीय-अमेरिकन शेफ आणि लेखक
१९६४: मार्क टेलर — ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९५४: अनुराधा पौडवाल — पार्श्वगायिका
१९४९: अ. अय्यप्पन — भारतीय कवी आणि अनुवादक (निधन: २१ ऑक्टोबर २०१० )
१९४७: डॉ. विकास आमटे — समाजसेवक
१९२३: अरविंद मफतलाल — उद्योगपती (निधन: ३० ऑक्टोबर २०११ )
१९२०: के. आर. नारायणन — भारताचे १०वे राष्ट्रपती (निधन: ९ नोव्हेंबर २००५ )

## मृत्यू

२०२२: सतीशन पचेनी — भारतीय राजकारणी (जन्म: ५ जानेवारी १९६८ )
२०२२: निपॉन गोस्वामी — भारतीय अभिनेते (जन्म: ३ सप्टेंबर १९४२ )
२०१५: रंजीत रॉय चौधरी — भारतीय औषधीशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — पद्मश्री (जन्म: ४ नोव्हेंबर १९३० )
२००७: सत्येन कप्पू — हिंदी चित्रपटांतील चरित्र अभिनेते
२००१: प्रदीप कुमार — हिंदी व बंगाली अभिनेते (जन्म: ४ जानेवारी १९२५ )
२००१: भा. रा. भागवत — बालसाहित्यकार व विज्ञानकथाकार (जन्म: ३१ मे १९१० )
१९८७: विजय मर्चंट (विजयसिंग माधवजी मर्चंट) — भारतीय क्रिकेटपटू, उत्कृष्ट फलंदाज आणि क्रिकेट प्रशासक; प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये ऐतिहासिक फलंदाजीच्या सरासरीसाठी प्रसिद्ध, उद्योगपती व समाजसेवक — विस्डेन क्रिकेटर ऑफ द इयर, त्यांच्या सन्मानार्थ विजय मर्चंट ट्रॉफी सुरू (जन्म: १२ ऑक्टोबर १९११ )
१९७४: चक्रवर्ती रामानुजम — गणिती (जन्म: ९ जानेवारी १९३८ )
१९६४: वैकुंठ मेहता — सहकारी चळवळीचे प्रवर्तक (जन्म: २६ ऑक्टोबर १८९१ )
१९३७: उस्ताद अब्दुल करीम खान — किराणा घराण्याचे संस्थापक (जन्म: ११ नोव्हेंबर १८७२ )
१७९५: पेशवा सवाई माधवराव — मराठा साम्राज्याचे १२वे पेशवा (जन्म: १८ एप्रिल १७७४ )
१६१३: गॅब्रिएल बॅथोरी — ट्रान्सिल्व्हेनिया देशाचे राजकुमार (जन्म: १५ ऑगस्ट १५८९ )
१६०५: अकबर — तिसरा मुघल सम्राट (जन्म: १४ ऑक्टोबर १५४२ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**२७ ऑक्टोबर**

## युनायटेड किंगडमने आर्थिक बाजारपेठांवरील सर्व निर्बंध काढुन टाकले.

२७ ऑक्टोबर १९८६ हा ब्रिटनच्या आर्थिक इतिहासातील महत्त्वाचा दिवस मानला जातो. या दिवशी ब्रिटनने आपल्या आर्थिक बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या. या सुधारणांना ‘बिग बँग’ असे नाव देण्यात आले. या बदलांमुळे लंडनच्या शेअर बाजाराच्या कामकाजात आमूलाग्र परिवर्तन झाले आणि जागतिक आर्थिक बाजारपेठेच्या विकासाला नवी दिशा मिळाली.१९८० च्या दशकात ब्रिटनच्या आर्थिक व्यवस्थेत स्पर्धा वाढवणे आणि शेअर बाजाराचे कामकाज आधुनिक करणे आवश्यक मानले जात होते. त्या काळात लंडन स्टॉक एक्स्चेंजमध्ये शेअर्सची खरेदी-विक्री करण्यासाठी काही पारंपरिक नियम आणि पद्धती लागू होत्या. व्यवहारांवरील कमिशन निश्चित होते. तसेच दलाल आणि शेअर्सची खरेदी-विक्री करणारे व्यापारी यांच्या कामकाजात स्पष्ट विभागणी होती. या व्यवस्थेमुळे बाजारातील स्पर्धा मर्यादित राहत होती.ब्रिटन सरकारने आर्थिक क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी या नियमांमध्ये बदल करण्याचा निर्णय घेतला. २७ ऑक्टोबर १९८६ रोजी या सुधारणांची अंमलबजावणी झाली. त्यानंतर शेअर व्यवहारांवरील निश्चित कमिशनची पद्धत रद्द करण्यात आली. त्यामुळे आर्थिक संस्थांना व्यवहारांचे शुल्क ठरवताना अधिक स्वातंत्र्य मिळाले. विविध कंपन्यांमध्ये स्पर्धा वाढली आणि गुंतवणूकदारांना अधिक पर्याय उपलब्ध झाले.या सुधारणांचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे परदेशी कंपन्यांना ब्रिटनच्या आर्थिक बाजारपेठेत सहभागी होण्यासाठी अधिक संधी मिळणे. यामुळे आंतरराष्ट्रीय बँका आणि वित्तीय संस्थांचा लंडनच्या बाजारपेठेतील सहभाग वाढला. ब्रिटनची राजधानी लंडन ही जागतिक आर्थिक केंद्र म्हणून अधिक प्रभावी बनू लागली.‘बिग बँग’ सुधारणांमुळे तंत्रज्ञानाच्या वापरालाही मोठी चालना मिळाली. पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या व्यवहारांऐवजी संगणक आणि इलेक्ट्रॉनिक प्रणालींचा वापर वाढला. त्यामुळे व्यवहारांची गती वाढली आणि बाजारातील माहिती अधिक वेगाने उपलब्ध होऊ लागली. आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवण्याच्या प्रक्रियेलाही यामुळे मदत झाली.या बदलांचे काही परिणाम आव्हानात्मकही होते. आर्थिक बाजारपेठेतील स्पर्धा वाढल्याने मोठ्या वित्तीय संस्थांचे महत्त्व वाढले. तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि नियमन यांची गरज अधिक तीव्र झाली. बाजारातील व्यवहार अधिक गुंतागुंतीचे बनल्याने आर्थिक स्थैर्य राखण्यासाठी सक्षम देखरेख आवश्यक ठरली.एकूणच, १९८६ मधील ‘बिग बँग’ सुधारणा या ब्रिटनच्या आर्थिक क्षेत्रातील ऐतिहासिक घटना ठरल्या.

# के. आर. नारायणन यांचा जन्म; भारताचे दहावे राष्ट्रपती

**जन्मदिन विशेष**

के. आर. नारायणन यांचा जन्म २७ ऑक्टोबर १९२० रोजी केरळ राज्यातील कोट्टायम जिल्ह्यातील उझावूर या गावात झाला. त्यांचे पूर्ण नाव कोचेरिल रमण नारायणन असे होते. त्यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर भारताचे दहावे राष्ट्रपती होण्याचा मान मिळवला. नारायणन यांचे बालपण आर्थिक अडचणींमध्ये गेले. प्रतिकूल परिस्थिती असूनही त्यांनी शिक्षणाची जिद्द सोडली नाही. त्यांनी त्रावणकोर विद्यापीठातून इंग्रजी विषयात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांना लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे शिक्षण घेण्याची संधी मिळाली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पत्रकारिता केली. त्यानंतर भारतीय परराष्ट्र सेवेत प्रवेश केला. या सेवेत त्यांनी विविध देशांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले. चीन, जपान, ब्रिटन आणि अमेरिका यांसारख्या देशांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यांच्या कार्यामुळे त्यांची एक अनुभवी राजनैतिक अधिकारी म्हणून ओळख निर्माण झाली. १९८४ मध्ये त्यांनी राजकारणात प्रवेश केला आणि केरळमधील ओट्टापलम मतदारसंघातून लोकसभेवर निवडून आले. केंद्र सरकारमध्ये त्यांनी राज्यमंत्री म्हणूनही काम केले. त्यांच्या अनुभवामुळे त्यांना राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळाले. १९९२ मध्ये के. आर. नारायणन यांची भारताच्या उपराष्ट्रपतीपदी निवड झाली. त्यानंतर २५ जुलै १९९७ रोजी त्यांनी भारताचे दहावे राष्ट्रपती म्हणून पदभार स्वीकारला. दलित समाजातून राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचणारे ते पहिले व्यक्ती होते. त्यांची निवड भारतीय लोकशाही आणि सामाजिक समतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जाते. राष्ट्रपती म्हणून त्यांनी भारतीय संविधान, लोकशाही आणि सामाजिक न्याय या मूल्यांना महत्त्व दिले. सामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत ते संवेदनशील होते. त्यांनी राष्ट्रपतीपदाच्या जबाबदाऱ्या गांभीर्याने पार पाडल्या. त्यांच्या विचारशील भूमिकेमुळे आणि संविधानावरील निष्ठेमुळे त्यांना देशभरात आदर मिळाला. के. आर. नारायणन यांनी १९९७ ते २००२ या काळात राष्ट्रपतीपद भूषवले. ९ नोव्हेंबर २००५ रोजी नवी दिल्ली येथे त्यांचे निधन झाले. के. आर. नारायणन यांचे जीवन संघर्ष, शिक्षण आणि जिद्दीचे प्रेरणादायी उदाहरण आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. भारतीय लोकशाही, सामाजिक समता आणि संविधानिक मूल्यांप्रती असलेले त्यांचे योगदान कायम स्मरणात राहील. के. आर. नारायणन यांनी आपल्या कार्यकाळात लोकशाही संस्थांचा सन्मान आणि संविधानाचे संरक्षण यांना विशेष महत्त्व दिले. त्यांनी राष्ट्रपती म्हणून अनेक महत्त्वाच्या घटनात्मक निर्णयांमध्ये विचारपूर्वक भूमिका घेतली. त्यांच्या मते, देशाची प्रगती साधण्यासाठी शिक्षण, सामाजिक समानता आणि सर्वसामान्य नागरिकांना समान संधी मिळणे आवश्यक होते. साध्या कुटुंबातून सुरू झालेला त्यांचा प्रवास देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचला.



पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
ताम्हाणे हॉस्पिटल
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2026-28

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



## पावसाळा संपताच तालुक्यात पाणीटंचाईचे सावट

### नऊ गावांसह १७ वाड्यांना नऊ टँकरने पाणीपुरवठा; शेती ठप्प



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळा संपताच संगमनेर तालुक्यात पाणीटंचाईचे संकट गडद झाले असून, दिवाळीपूर्वीच ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. यंदा पावसाने ओढ दिल्याने तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, नऊ गावांसह १७ वाड्यांना सध्या नऊ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. ही माहिती गटविकास अधिकारी प्रवीण सिनोरे यांनी दिली.

पावसाळ्यात अपेक्षित पाऊस न झाल्याने विहिरी, बोअरवेल आणि पाणीसाठ्यांवर मोठा परिणाम झाला आहे. ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याबरोबरच जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच टंचाईची तीव्रता वाढल्याने ग्रामस्थांमध्ये चिंता पसरली आहे. आगामी काळात पाणीटंचाई आणखी तीव्र झाल्यास टँकरची संख्या आणि फेऱ्या वाढविण्याची वेळ प्रशासनावर येण्याची शक्यता आहे.

पाण्याच्या संकटासोबतच ग्रामीण भागातील रोजगाराचा प्रश्नही गंभीर झाला आहे. पावसाअभावी शेतीची कामे ठप्प झाली असून, शेतमजुरांच्या हाताला पुरेसे काम मिळत नसल्याचे चित्र आहे. शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांच्या उत्पन्नावर त्याचा थेट परिणाम होत आहे. एकीकडे पिण्याच्या पाण्याची चिंता, तर दुसरीकडे रोजगाराचा अभाव, अशा दुहेरी संकटात ग्रामीण कुटुंबे सापडली आहेत.

दिवाळीसारखा महत्त्वाचा सण तोंडावर असताना घरखर्च, सणाची तयारी आणि दैनंदिन गरजा भागविणे अनेक कुटुंबांसाठी कठीण झाले आहे. त्यामुळे पाणीपुरवठ्याबरोबरच रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करून ग्रामीण मजुरांना आधार देण्याची मागणी होत आहे.

सध्या पंचायत समितीच्या माध्यमातून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला, तरी संभाव्य टंचाई लक्षात घेऊन प्रशासनाने आतापासूनच ठोस नियोजन करणे आवश्यक आहे. टंचाईग्रस्त गावांतील पाण्याची गरज नियमितपणे तपासणे, टँकरच्या फेऱ्यांचे पारदर्शक आणि योग्य नियोजन करणे तसेच गरज भासल्यास अतिरिक्त टँकरची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

त्याचबरोबर ग्रामीण भागातील मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी रोजगार हमीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याची मागणी होत आहे. पाणीटंचाई आणि रोजगाराचा प्रश्न एकाच वेळी गंभीर होत असल्याने केवळ टँकरपुरत्या तात्पुरत्या उपाययोजनांवर न थांबता जलसंधारण, पाणी पुनर्भरण आणि रोजगारनिर्मितीचे दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे.

पावसाळा संपताच पाणीटंचाई सुरू झाल्याने संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर वर्ष कसे जाईल, हा मोठा प्रश्न उभा राहिला आहे. पाण्यासाठी टँकर, कामासाठी प्रतीक्षा आणि शेतीच्या भवितव्याची चिंता, अशा तिहेरी संकटात ग्रामीण जनता सापडली आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी पाणीपुरवठा, निळवंडेचे आवर्तन, जलसंधारण आणि रोजगारनिर्मिती या सर्व आघाड्यांवर प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.

## अवैध वाळू वाहतुकीवर एलसीबीचा छापा

### टिप्पर व वाळूसह १५ लाखांचा मुद्देमाल जप्त; दोघांना अटक



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, कासारवाडी-खांडगाव येथील प्रवरा नदीपात्रात सुरू असलेल्या कथित अवैध वाळू उपशावर अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेने शनिवारी (दि. २४) धडक कारवाई केली. नदीपात्रातून विनापरवाना वाळू भरून वाहतूक करण्याच्या तयारीत असलेल्या ठिकाणी छापा टाकत पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले. या कारवाईत टिप्पर आणि वाळूसह तब्बल १५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी अवैध धंद्यांविरोधात कारवाई करण्यासाठी विशेष पथक नियुक्त केले होते. या पथकात पोलीस अंमलदार अरुण गांगुर्डे, अभिजीत अरकल, रणजीत जाधव, दीपक जाधव, विशाल तनपुरे, बाळासाहेब गुंजाळ आणि अजिनाथ पाखरे यांचा समावेश होता.

शनिवारी हे पथक संगमनेर शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना, कासारवाडी-खांडगाव येथील प्रवरा नदीपुलाखाली नदीपात्रातून विनापरवाना वाळू काढून टिप्परमध्ये भरली जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. अमोल जोंधळे व त्याचे साथीदार या ठिकाणी वाळूची वाहतूक करणार असल्याची माहिती मिळताच पथकाने तातडीने संबंधित ठिकाणी धाव घेतली.

पंचांसमक्ष खात्री केली असता काही जण नदीपात्रातून टिप्परमध्ये वाळू भरताना आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी छापा टाकून दोघांना ताब्यात घेतले.

**टिप्पर आणि वाळू जप्त**

या कारवाईत सनी संजय चव्हाण (वय १९, रा. साईखिंडी फाटा, डी मार्ट शेजारी, संगमनेर) आणि अमोल संजय जोंधळे (वय २७, रा. गुंजाळवाडी, ता. संगमनेर) या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून एमएच १७, सीव्ही ३४३० क्रमांकाचा टिप्पर आणि वाळू असा एकूण १५ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

प्रवरा नदीपात्रातील वाळू उपसा आणि विनापरवाना वाहतुकीविरोधात झालेल्या या कारवाईमुळे अवैध वाळू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. नदीपात्रातील नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण आणि अवैध गौण खनिज उत्खननाला आळा घालण्यासाठी अशा कारवायांना सातत्य मिळणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
SMBT BANK
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

## अखेर'निळवंडे'चे आवर्तन बंद, ४५८६ दलघफू पाण्याचे वाटप

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले- निळवंडे धरणातून १४ सप्टेंबरपासून सुरू असलेले भंडारदरा लाभक्षेत्राचे आवर्तन अखेर ४१ दिवसांनंतर बंद करण्यात आले आहे. या कालावधीत भरणातून प्रचरा नदीपात्रात तब्बल ४ हजार ५८६ दशलक्ष घनफूट (दलघफू) पाणी सोडण्यात आले. धधरणाच्या निर्मितीनंतर इतक्या प्रदीर्घ काळ चाललेले हे आवर्तन असल्याचे मानले जात आहे. दरम्यान, आवर्तन संपल्यानंतर निळवंडे धरणात सुमारे ४ हजार ८४१ दलघफू पाणीसाठा शिल्लक असून, पाण्याच्या नियोजनावरून जलसंपदा विभागाच्या कार्यपद्धतीबाबत पुन्हा



एकदा प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

निळवंडे धरणातून सुरू असलेल्या आवर्तनाच्या कालावधीत पाण्याचा वापर आणि संभाव्य उधळपट्टीचा मुद्दा चर्चेत आला होता. आवर्तन बंद करून अकोले तालुक्यातील उच्चस्तरीय कालव्याचे पाणी पुन्हा सुरू करावे, अशी मागणी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी केली होती. या संदर्भात झालेल्या बैठकीत आमदार डॉ. किरण लहामटे यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारण्यात आला. धरणातील उपलब्ध पाणीसाठा, सिंचनाचे नियोजन आणि विविध भागांना पाणी देताना राखावयाचा समतोल याबाबत यावेळी प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. पाण्याचा वापर गरजेनुसार आणि नियोजनबद्ध पद्धतीने व्हावा, अशी मागणीही करण्यात आली होती. दरम्यान, निळवंडे धरणातील पाणीसाठा कमी झाल्याने २७ ऑक्टोबर रोजी उत्त्वस्तरीय कालव्याचे आवर्तनही बंद करण्यात आले. या आवर्तनाच्या कालावधीत सुमारे ८० दलघफू पाण्याचा वापर झाला आहे, या कालव्यांसाठी एकूण २७४ दलघफू पाणी मंजूर करण्यात आलेले आहे. त्यामुळे मंजूर पाण्यापैकी उर्वरित पाण्याचा वापर कधी आणि कशा पद्धतीने होणार, याकडे संबंधित लाभक्षेत्रातील शेतकयांचे लक्ष लागले आहे. उच्चस्तरीय कालव्याचे आवर्तन पुन्हा सुरू करण्यासाठी भंडारदरा धरणातून पाणी सोडण्याची आवश्यकता आहे. सध्या भंडारदरा घरणात ९९.५३ टक्के पाणीसाठा असल्याची माहिती आहे. पाणी सोडून उच्चस्तरीय कालव्याचे आवर्तन पुन्हा सुरू करण्याबाबत जलसंपदा विभाग काय निर्णय घेतो, याकडे अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165




कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिश्रमनाय्
सर्जरी विभाग • अतिदक्षता विभाग • अपघात विभाग
डायलिसीस विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • न्यूरोविभाग
हृदयरोग विभाग • मेडिसीन विभाग • अद्ययावत कॅथलॅब
जॉईंट रिप्लेसमेंट • स्पाईन सर्जरी • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25